# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ-तक्रार क्र. बीएम- १२ /२०२०**

**तक्रारकर्ता श्री. खुर्शिद बानो सदिक अली**
८१९, ४ था मजला, प्लॉट नं.१६०, उस्मानिया बिल्डींग, चंद्रमणी बुध्दविहार मार्ग, स्टेबल स्ट्रिट,
कामठी पुरा, मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक,**
शिक्षण निरीक्षक कार्यालय, बृहन्मुंबई दक्षिण विभाग, ईविटा इम्प्रेस इमारत,
१ ला मजला, ग. द. आंबेकर, मार्ग, परेल,मुंबई ४०००१२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक**
शिक्षण निरीक्षक कार्यालय, बृहन्मुंबई दक्षिण विभाग, ईविटा इम्प्रेस इमारत,
१ ला मजला, ग. द. आंबेकर, मार्ग, परेल,मुंबई ४०००१२.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०३.०२.२०२०**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र.४००८/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. १६१४/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. ०१.०१.२०२० रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत :-

१) *"अपिलार्थी यांनी दाखल केलेले व्दितीय अपील अर्ज कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून दाखल करण्यात येत आहेत.*

२) *सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०३.०२.२०२० रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात येईल."*

उक्त आदेशानुषंगाने अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज तक्रार क्र.१२/२०२० मध्ये दाखल करण्यात आला असून सदर तक्रार अर्जावर आज दि.०३.०२.२०२० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा अहवाल दिनांक ०१ फेब्रुवारी २०२० आयोगासमोर सादर केला व असे नमूद केले की, मुद्दा क्रमांक २ व ४ संबंधी कोणतीही माहिती जनरेट झालेली नाही. कारण, कोणताही प्रस्ताव सादर करण्यात आलेला नव्हता. मुद्दा क्रमांक ३ संबंधी माहिती तक्रारकर्ते यांना मिळालेली आहे. मुद्दा क्रमांक १ मध्ये नियुक्ती पत्राची प्रत विचारण्यात आली होती व त्याची प्रत तक्रारकर्ते यांना देण्यात आली आहे, असे संबंधीत शाळेचे पत्र दिनांक ०७.०१.२०२० मध्ये नमूद आहे. तथापि, तक्रारकर्ते यांनी असे नमूद केले की, नियुक्ती पत्र त्यांना प्राप्त झालेले नाही.

तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालाची पुढील तपासणी कार्यालय यांनी करुन योग्य त्या पुढील ~~कार्यवाही~~ सादर करावे.

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**मुंबई**
**दिनांक : ०३.०२.२०२०**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- १२/२०२०**
**तक्रारकर्ता श्री. खुर्शिद बानो सदिक अली**
**सुनावणी दिनांक : २३.०४.२०२५** (In continuation of order dt ०३.०२.२०२०)

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०४.०४.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०४.०४.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालाची पुढील तपासणी कार्यालय यांनी करुन योग्य त्या पुढील आदेशासाठी सादर करावे असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणी वेळी तक्रारकर्ता उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असल्याने तक्रारकर्ता यांचे माहिती अर्जातील मुद्दा क्र. १ मध्ये नियुक्ती पत्रासंबंधीत त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले किंवा नाही? याबाबत स्पष्टता होऊ शकलेली नाही. या कारणामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रकरणासंबंधीत माहितीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १६.०५.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**मुंबई**
**दिनांक : २४.०४.२०२५**

निर्गमित
दिनांक 28 APR 2025

# रामाआ- तक्रार क्र. बीएम- १२/२०२०
# तक्रारकर्ता श्रीम. खुर्शिद बानो सदिक अली
# सुनावणी दिनांक : १६.०५.२०२५ (In continuation of order dt २४.०४.२०२५)

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असल्याने तक्रारकर्ता यांचे माहिती अर्जातील मुद्दा क्र. १ मध्ये नियुक्ती पत्रासंबंधीत त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले किंवा नाही? याबाबत स्पष्टता होऊ शकलेली नाही. या कारणामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रकरणासंबंधीत माहितीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी दि. ०१.०२.२०२० रोजी सादर केलेल निवेदन आयोगासच्या निदर्शनास आणून त्यात नमूद केले की, दारुल सलाम उर्दु हायस्कूल अँटॉप हिल, मुंबई शासनमान्य विनाअनुदानित अल्पसंख्यांक शाळा आहे. सध्या कार्यरत मुख्याध्यापक यांच्या आधी संस्थेने श्रीम. खुर्शीद बानो यांची प्रभारी मुख्याध्यापिका महणून नेमणूक केली होती. श्रीम. खुर्शीद बानो यांचेकडे शाळेतील नोंदवहया, दस्तऐवज इ. सुपूर्व करणेकरिता वारंवार विचारणा केली असतां सर्व दस्तऐवज शाळेतच उपलब्ध असल्याचे सांगून शाळेचे दस्तऐवज व नोंदवहया देण्यास नकार दिला. सहा. शिक्षक व मुख्याध्यापक पदी वैयक्तिक मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शाळेत आढळून आला नाही. वास्तविक पाहतां श्रीम. खुर्शीद बानो यांना स्वाक्षरीचे अधिकार देण्यात आले असल्याने त्यांच्या सहाय्यक शिक्षक / मुख्याध्यापक पदी वैयक्तिक मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव संस्थेमार्फत शिक्षण विभागाकडे पाठविण्याची जवाबदारी प्रभारी मुख्याध्यापिका म्हणून श्रीम. खुशीद बानो यांची होती. संस्थेकडे उपलब्ध अभिलेख्यांचे अवलोकन केले असतां श्रीम. खुशीद बानो यांनी वैयक्तिक मान्यतेचा प्रस्ताव शिक्षण विभागास सादर केलेला नाही असे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. १६.०५.२०२५ रोजीचे लेखी निवेदन आयोगासमोर सादर करुन असे नमूद केले की, श्री. नगमूल इक खान संस्था पदाधिकारी यांनी श्रीम. खुर्शीद बानो सादिक अली यांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या (रिट याचिका क्र. १८०९/२०१७) याचिकेची प्रत दि.१५.०५.२०२५ रोजी या कार्यालयास सादर केली आहे. सदर याचिकेसोबत श्रीम. खुर्शीद बानो सादिक अली यांना शाळेने दिलेल्या वर्षनिहाय नियुक्ती मा.उच्च न्यायालयात सादर केली आहे. सदर याचिकेमध्ये श्रीम. खुर्शीद बानो सादिक अली यांनी नियुक्तीपत्र माहिती अधिकार अंतर्गत प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे. यावरुन असे निदर्शनास येत आहे की, तक्रारदार श्रीम. खुर्शीद बानो सादिक अली यांना हवी असलेली माहिती यापूर्वीच उपलब्ध झालेली आहे. तरीसुद्धा सदर तक्रार अर्जाच्या सुनावणीस अनुसरुन श्रीम. खुर्शीद बानो सादिक अली यांना हवी असलेली नियुक्ती पत्राची माहिती पुनःश्च विनामुल्य उपलब्ध करून देण्यात येत आहे.

..२/-

जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०१.२०२० रोजी स्पष्ट कळविले आहे की, Proposal of Asst. Teacher and HM and Approval of Asst. Teacher and HM aren't available with us. सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता यांना यापूर्वी देण्यात आलेल्या माहितीची प्रत पुन्हा देण्यात आली.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai
सत्यमेव जयते

21-5-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २१.०५.२०२५**